पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८, लेखा विभाग
क्र.लेखा/७अ /कावि/६८४/२०१९
दिनांक ४/६/२०१९ ६६४

प्रति,

सर्व सबंधित विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-४११०१८

विषय- देयके अदायगीबाबत.....

परिपत्रक

मनपाच्या विविध विभागांचे कामाची देयके अदायगीकामी लेखा विभागात सादर केली जातात. सदर देयकांची तपासणी केली असता प्रस्ताव, आदेश, दाखले व फॉर्म क्रं.२२ वर वेगवेगळया अधिका-याच्या सह्या आढळून येतात. त्यामुळे देयके अदायगीकामी अडचण निर्माण होते. मा.आयुक्तसो यांनी बीले अदायगीकामी मंजूरीचे तसेच आहरण वितरणाचे ज्या अधिका-यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. त्याच विभागप्रमुख/शाखाप्रमुख यांची देयकावर स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. आहरण वितरण अधिकारी रजेवर असलेस रजेच्या कालावधीत ज्या अधिका-यांची देयके अदायगीकामी नेमणूक केली आहे, त्यांचे आदेशाची प्रत देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. आपले विभागाकडील आहरण वितरण अधिकारी यांचे सह्याचे नमुने खालीलप्रमाणे लेखाशाखेकडे सादर करावेत.

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| अ.क्र | आहरण/वितरण अधिकारी यांचे नाव | विभागाचे नाव | स्वाक्षरीचे नमुने |

विभागाचे/ठेकेदारांचे देयके लेखा शाखेकडे अदायगीकामी सादर करताना उपरोक्त बाबीची पूर्तता न केल्यास लेखाशाखेमार्फत बीले अदा केली जाणार नाहीत. याची संबधितांनी नोंद घ्यावी.

मुख्य लेखा अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८